मंगळवार, दि. ८ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २४५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ | 8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282





जालना येथील सुभाष चौक येथे विरूद्ध दिशेने जाणाऱ्या वाहनांमुळे नेहेमीच वाहतुकीची कोंडी होत आहे वाहतूक शाखेचे अधिकारी कर्मचारी लक्ष देण्याची गरज आहे. (छाया/जावेद तंबोली)

## गॅस सिलिंडर ५० रुपयांनी महाग

**नवी दिल्ली -** सेन्सेक्सची घसरण आणि पेट्रोल-डिझेलचे भाव वाढल्यानंतर आता सर्वसामान्यांना धक्का देणारी आणखी एक बातमी समोर आली आहे. गॅस सिलेंडर ५० रुपयांनी महाग झाला आहे. त्यामुळे उज्ज्वला योजनेअंतर्गत मिळणारे सिलेंडर ५५० रुपयांवर गेला आहे. तर बिगर उज्ज्वला योजनेतील सिलेंडर ८०३ वरून ८५३ रुपयांवर पोहोचला आहे. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी याबाबत माहिती दिली. आधीच वाढणारी महागाई, त्यात सिलेंडरही महाग झालं आहे. त्यामुळे याचा परिणाम सामान्यांच्या बजेटवर होणार आहे.

एलपीजी गॅस दरवाढ आणि पेट्रोल-डिझेलच्या वाढलेल्या किमती ८ एप्रिल मध्यरात्री १२ वाजल्यापासून लागू होणार आहेत. गॅस विक्रीत तेल कंपन्यांचे ४३,००० कोटी रुपयांचे नुकसान भरून काढण्यासाठी ही वाढ करण्यात आल्याची माहिती आहे.


केंद्र सरकारने दिलेल्या माहितीनुसार, मंगळवार, ८ एप्रिल २०२५ पासून एलपीजी गॅस सिलिंडरच्या किमतीत ५० रुपयांनी वाढ करण्यात येत आहे. ही वाढ उज्ज्वला योजना आणि उज्ज्वला नसलेल्या सर्व ग्राहकांना लागू होईल.

ग्रामीण भागातील गरीब महिलांना स्वयंपाकाचे स्वच्छ इंधन मिळावे म्हणून प्रधानमंत्री उज्ज्वला योजना अंतर्गत मोफत गॅस कनेक्शन दिले जाते. नवीन किमतींनुसार उज्ज्वला योजना आणि इतर ग्राहकांना गॅस सिलिंडरसाठी ५० रुपये अधिक मोजावे लागणार आहेत. इंधनाचे दर हे सरकारच्या नियंत्रणात नाहीत. त्यामुळे गॅस दराचा दर १५ ते ३० दिवसात आढावा घेतला **पान २ वर**

### कैलास गोरंटयाल यांच्या वाढदिवसानिमित्त

# बुधवारी कुस्त्यांची भव्य दंगल

## लाखोंची बक्षिसे; कुस्ती प्रेमींनी उपस्थित राहण्याचे आवाहन





**जालना । प्रतिनिधी -** जालन्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांच्या वाढदिवसा निमित्त जालना शहरात दि.९ एप्रिल बुधवार रोजी दुपारी १ वाजता जलसम्राट केसरी कुस्त्यांची भव्य दंगल आयोजित करण्यात आली आहे.या स्पर्धेत राज्यातील नामांकित मल्ल सहभागी होणार असून लाखो रुपयांची बक्षिसांची लयलूट केली जाणार असल्याची माहिती संयोजकांच्या वतीने देण्यात आली आहे.

शहरातील आझाद मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन खा.डॉ.कल्याण काळे यांच्या हस्ते करण्यात येणार असून अध्यक्षस्थानी राज्याचे माजी मंत्री राजेश टोपे हे राहणार आहेत. तर जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा पोलिस अधीक्षक अजयकुमार बंसल, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, जालना मनपाचे आयुक्त संतोष खांडेकर, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, राकॉंचे जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, प्रदेश सदस्य एकबाल पाशा, काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र राख,बंकटलाल यादव, पै. भरत मेकाले, हंसराज डोंगरे, कुस्तीगीर परिषदेचे राज्य उपाध्यक्ष प्राचार्य दयानंद भक्त, युवा नेते अक्षय गोरंटयाल, जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे,काँग्रेस अल्पसंख्याक आघाडीचे बदर चाऊस, शिवसेनेचे शहरप्रमुख बाला परदेशी, भाजयुमोचे शहराध्यक्ष सुनील खरे, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष विजय चौधरी, माजी सभापती महावीर ढक्का,व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष सतीश पंच, माजी नगराध्यक्ष बबलू चौधरी, दीपक भुरेवाल, घनशाम खाकीवाले,बाबुराव मामा सतकर, राकॉंचे शहराध्यक्ष नंदकिशोर जांगडे, कुस्ती संघाचे जिल्हाध्यक्ष रवि राऊत,शिवाजी शेजुळ,कुंदन काठोठीवाले, काँग्रेसच्या महिला आघाडीच्या अध्यक्षा नंदाताई पवार आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. जालना शहर व जिल्ह्यातील कुस्तीप्रेमी जनतेने मोठया संख्येने उपस्थित राहून स्पर्धेचा आनंद घ्यावा असे आवाहन काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उबाठा,कैलास गोरंटयाल मित्रमंडळ आणि आयोजन समितीने केले आहे.

### नामवंत मल्लांचा सत्कार

या प्रसंगी कुस्ती क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत महाराष्ट्र राज्याचे नाव उज्वल करणाऱ्या नामवंत मल्लांचा आयोजकांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात येणार आहे. त्यात प्रामुख्याने या वर्षाचे महाराष्ट्र केसरी वेताळ शेळके,डबल महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे,पंजाब केसरी शेंडीकुमार, महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील,हर्षवर्धन सदगीर,प्रशांत जगताप, सतपाल सोनटक्के यांचा समावेश आहे.

## युवा आदर्श

### कारसेवी ...

असे साधे कारसेवी
निभावले फक्तधर्मा
परिसाचे कर ईश्वरी
सोन झळाळी कर्मा
बांधून घेतले मंदिर
प्रभू सार्थ विश्वकर्मा
आम्ही घेई श्रेय फुके
कर्तृत्वाचे राही भ्रमा
तोचं कर्ता करविता
निर्मीला रे लवाजमा
आम्ही बांधले मंदीर
पुण्य नावावर जमा
तव कृपे वास्तु उभी
धन्यवाद पुरूषोत्तमा
अमूर्तईश मूर्तरुपात
सहज साधे विक्रमा
याचं देही याचं डोळा
पाहू श्री राम गरिमा
अमावस्या लुप्त होई
झळाळे शतपौर्णिमा
राजकारण अधेमध्ये
शुभकार्ये नकाळीमा
रामा सर्वा सुबुध्दी दे
उगाचं कसा लघिमा
अयोध्येवर युद्धनको
दावा आपला महिमा
रावणांचेही मनी वसे
पुरुषोत्तमाची प्रतिमा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## रोजगार मेळाव्यातून ८४ उमेदवारांची प्राथमिक निवड

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर जालना व मत्स्योदरी शिक्षण संस्था अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ४ एप्रिल, २०२५ रोजी बेरोजगार तरुणांसाठी जालना येथील मत्स्योदरी शिक्षण संस्था अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा व मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण मेळावा पार पडला. पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात ८४ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली, असे कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताचे **पान २ वर**

## जिल्हा क्रिकेट असोसिएशन जालना तर्फे १३ एप्रिल रोजी १५ वर्षाखालील मुलींची निवड चाचणी

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय निमंत्रितांच्या स्पर्धा होणार असून त्यासाठी जिल्हा क्रिकेट असोसिएशन जालना तर्फे १५ वर्षाखालील मुलींची जिल्हा संघ निवड चाचणी रविवार दिनांक १३ एप्रिल २०२५ सकाळी १० वाजता साईकाने अक्ॅडमी Astro Turf, एमआरडीए स्कूल जवळ रोहन वाडी रोड जालना येथे घेण्यात येणार आहे.

या निवड चाचणीसाठी १ सप्टेंबर २०१० या तारखेनंतर जन्मलेल्या मुलींना सहभागी होता येणार आहे इच्छुक मुलींनी साईकाने क्रिकेट अक्ॅडमीच्या ीीी ढीष एमआरडीए स्कूल जवळ रोहनवाडी रोड जालना , येथे १३ एप्रिल रविवार रोजी सकाळी १० वाजता उपस्थित राहावे.

या निवड चाचणी साठी उपस्थित असणाऱ्या मुलींना , जन्म प्रमाणपत्र , आधार कार्ड, टी सी , दहावीची सनद इ . च्या सत्यप्रती सोबत आणणे आवश्यक आहे. असे आवाहन जिल्हा क्रिकेट असोसिएशन जालना चे अध्यक्ष एडवोकेट नरेंद्र देशपांडे , राजू काने , अभिजीत चव्हाण इत्यादी सदस्यांच्या वतीने करण्यात येत आहे.

या निवड चाचणीतून निवड झालेल्या मुलींना महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय निमंत्रितांच्या स्पर्धेत जालना जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळेल सर्व खेळाडूंनी क्रिकेट पोशाखात स्वतःचे क्रिकेट साहित्य सर्व उपस्थित राहावे व अधिक माहितीसाठी ९८२३३७३३६१ / ९९२२९३३१३८ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## २०२९ मध्ये आदित्य ठाकरेंच्या नेतृत्वाखाली निवडणूका - खैरे

**जालना । प्रतिनिधी -** २०२९ मध्ये आदित्य ठाकरेंच्या नेतृत्वाखाली निवडणूका होतीलआणि आदित्य ठाकरे मुख्यमंत्री बनतील असं भाकीत छत्रपती संभाजीनगरचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी वर्तवल आहे. आज दि.०७ सोमवार रोजी दुपारी एक वा. च्या सुमारास जालन्यात शितल गार्डन येथे एका लग्न समारंभात भेट देण्यासाठी आलेले असतांना खैरे यांनी पत्रकारांशी संवाद साधला यावेळी त्यांनी २०२९ साली भाजपचं अंधपतन होऊन शिवसेना सत्तेत येणार असल्याचा दावा केला.

रावसाहेब दानवेंनी सिग्मा हॉस्पिटलमध्ये बसून माझा २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत पराभव केला असा आरोप खैरे यांनी केला. आमच्याच नगरसेवक आणि नेत्याला **पान २ वर**

## आजपासून जालन्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला

**जालना । प्रतिनिधी -** सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करणाऱ्या जालना शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेस मंगळवार दिनांक ८ एप्रिल २०२५ पासून सुरूवात होणार आहे. सलग पाच दिवस चालणाऱ्या या व्याख्यानमालेत महाराष्ट्रातील प्रसिद्ध लेखक व विचारवंत आपले विचार मांडणार आहेत.



४८ व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेस दिनांक ८ एप्रिल २०२५ पासून सुरूवात होत आहे. दिनांक ८ एप्रिल ते १२ एप्रिल दरम्यान सांयकाळी ७ वाजता जालना शहरातील अंबड रोडवरील नूतन वसाहत भागात असलेल्या स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या प्रांगणावर या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक ८ एप्रिल २०२५ रोजी आमदार अर्जूनराव खोतकर यांच्या हस्ते या व्याख्यानमालेचे उद्घाटन होणार आहे. यानंतर पुणे येथील लेखक व विचारवंत श्रीरंजन आवटे हे ' भारतीय संविधान, आपलं आयकार्ड' याविषयावर व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफणार आहेत. यावेळी ज्येष्ठ सामाजिक नेते ड. ब्रम्हानंद चव्हाण हे अध्यक्षस्थानी राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक घनश्यामदास गोयल, सामाजिक नेते सुधाकर निकाळजे, अशोक साबळे ,जालना जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ड. अनिरुद्ध घुले हे उपस्थित राहणार आहेत.

दिनांक ९ एप्रिल रोजी लेखक तथा विचारवंत संजय आवटे हे ' चला उभारूया नवी पिढी' या विषयावर व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफणार आहेत. यावेळी ज्येष्ठ सामाजिक नेते ड. बी. एम. साळवे हे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनियार,दीशा नॉलेज सिटीचे संचालक डॉ. सुशील सूर्यवंशी, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डेव्हिड घुमारे, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर एखंडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. दिनांक १० एप्रिल रोजी अकोला येथील विचारवंत चंद्रकांत झटाले हे ' स्वयंघोषित देशभक्तांचे वास्तव' या विषयावर व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफणार आहेत. यावेळी रिपाइंचे जालना जिल्हाध्यक्ष गणेशराव रत्नपारखे हे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. माजी आमदार कैलास गोरंट्याल ,डॉ.प्रदीप हुशे, डॉ. दयानंद भक्त, डॉ. संजय लाखे पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

दिनांक ११ एप्रिल रोजी अमरावती येथील प्रसिद्ध विचारवंत रजिया सुलताना ह्या 'स्त्री समजून घेतांना' या विषयावर व्याख्यानमालेचे चौथे पुष्प गुंफणार आहेत. यावेळी डॉ. मीना बोर्डे ह्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. माजी आमदार राजेश टोपे, जिल्हा पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल,जालना जिल्हा परिषदेचे माजी सभापती सुदामराव सदाशिवे, **पान २ वर**

## संपादकीय

# ट्रम्प यांच्या विरुद्ध 'हॅण्डस ऑफ'

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर येऊन जेमतेम तीन महिने झाले. या तीन महिन्यातच अमेरिकन जनता त्यांना वैतागली असल्याचे दिसून येत आहे. ज्या अमेरिकन जनतेने तीन महिन्यापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांना भरभरून मते देऊन राष्ट्राध्यक्ष बनवले तीच अमेरिकन जनता आता त्यांच्या विरुद्ध रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहे. विशेष म्हणजे ही आंदोलने फक्त एका शहरात किंवा राज्यात होत आहेत असे नाही तर अमेरिकेतील सर्वच्या सर्व म्हणजे पन्नास राज्यातील बाराशे शहरात होत आहेत आणि त्यात लाखो अमेरिकन नागरिक सहभागी होत आहेत. आंदोलकांनी या आंदोलनाला 'हॅण्डस ऑफ' आंदोलन असे नाव दिले असून हे आंदोलन लोकशाहीसाठी असल्याचे सांगितले जात असून या आंदोलनात अमेरिकेतील दीडशे पेक्षा जास्त गटांनी सहभाग घेतला असून त्यात सामाजिक हक्क संघटना, कामगार संघटना, एलजीबिटीक्यू प्लस समर्थक गट, सामाजिक आणि लोकशाहीवादी गटांचा समावेश आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधातले हे आंदोलन शांततेच्या मार्गाने चालू असल्याने कोणालाही अटक करण्यात आली नाही मात्र या आंदोलनामुळे अमेरिका आणि डोनाल्ड ट्रम्प यांची जगभर अप्रतिष्ठा झाली आहे हे मात्र नक्की. आंदोलकांनी केवळ डोनाल्ड ट्रम्प यांच्याच विरोधात नव्हे तर त्यांचे सहाय्यक लन मस्क यांच्या विरोधातही घोषणा दिल्या आहेत. तीन महिन्यांपूर्वी ज्या डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेने सत्तेवर बसवले त्यांच्याच विरोधात जनतेला रस्त्यांवर का उतरावे लागत आहे असा प्रश्न विचारला जात आहे. त्याचे उत्तर आहे ट्रम्प यांचा एककल्ली आणि मनमानी कारभार. राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी निर्णयांचा धडाका लावला आहे पण हे निर्णय घेताना त्यांनी अनेकांना दुखावले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी इतर देशातून आयात होणाऱ्या मालांवर भरमसाठ कर लावला आहे. हे करताना त्यांनी अमेरिकेचेच भले होणार असे जनतेला ठासून सांगितले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या निर्णयाला मेक्सिको, चीन, भारत, कॅनडा या देशांनीही जशास तसे उत्तर देऊन अमेरिकेतून आयात होणाऱ्या मालांवर तितकाच अतिरिक्त कर लावला आहे त्यामुळे जगात व्यापार युद्धाला तोंड फुटले आहे याचा परिणाम जितका जगावर होणार आहे तितकाच तो अमेरिकेवर देखील होणार आहे. या व्यापार युद्धामुळे अमेरिकन बाजारपेठेत मंदी येण्याची भीती तेथील तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. जर अमेरिकेत मंदी आली तर अमेरिकेत महागाई वाढेल त्याचा फटका तेथील सर्वसामान्य नागरिकांनच बसेल त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांचा हा निर्णय तेथील सर्वसामान्य लोकांना पटलेला नाही. केवळ हा एकमेव निर्णय नाही तर गेल्या काही दिवसात ट्रम्प यांनी घेतलेले अनेक निर्णय जनतेच्या पचनी पडले नाहीत त्यात हजारो केंद्रीय कर्मचाऱ्यांची कपात, सामाजिक सुरक्षा व्यवस्थापन कार्यालये बंद करणे, मदत एजेंसी बंद करणे, स्थलांतरितांना हद्दपार करणे, तृतीय पंथीयांच्या कामाच्या संधी कमी करणे, आरोग्य कार्यक्रमांच्या निधीमध्ये कमी करणे हे आणि यासारखे अनेक निर्णय अमेरिकेतील जनतेला पटले नाहीत या निर्णयांना विरोध करण्यासाठीच अमेरिकन जनता रस्त्यावर उतरली आहे. जनतेचा वाढता रोष कमी करण्यासाठी व्हाईट हाऊस पुढे सरसावली आहे मात्र त्याचा आंदोलकांवर कोणताही परिणाम होताना दिसत नाही. आंदोलनाची धग वाढतच चालली आहे. एककल्ली, मनमानी कारभार केला तर जनता ती खपवून घेत नाही हेच या आंदोलनातून अमेरिकन जनतेने दाखवून दिले आहे. हे आंदोलन जर असेच चालू राहिले तर डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेपुढे झुकावेच लागेल आणि आपल्या एककल्ली स्वभावाला मुरड घालून जनतेच्या हिताचे असे सर्वसमावेशक निर्णय घ्यावे लागेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## श्रीराम नामाच्या जय घोषाने अवघे परतूर शहर झाले भगवामय

# प्रभू रामचंद्र हे आमच्या आस्थेचा विषय - आ. लोणीकर





**परतूर । प्रतिनिधी -** प्रभू रामचंद्र हे आमच्या आस्थेचा विषय असून, आज रामनवमीच्या निमित्ताने संपूर्ण परतुर शहरांमध्ये राम नामाचा जयघोष ऐकून मन आनंदित झाले असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले

ते परतुर येथे आयोजित रामनवमी उत्सव मिरवणुकी च्या प्रारंभ प्रसंगी बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की लाखो करोडो हिंदूंची अपेक्षा होती ते आयोध्या मध्ये प्रभू रामचंद्राचे मंदिर व्हावे ते स्वप्न प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सत्यात उतरवले असून यामुळे संपूर्ण भारत वर्षाला आनंद झाला असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले

गेल्या ४० वर्षांमध्ये मी परतूर शहरात एवढी भव्य दिव्य मिरवणूक प्रभू रामचंद्रांची बघितली नसल्याचे सांगतानाच आपले मन या मिरवणुकीमुळे आनंदित असून एकोप्याचा राम नवमी हा उत्सव असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले.

पुढे ते म्हणाले की कार सेवक म्हणून आपण स्वतः कार सेवेत सहभाग नोंदवला होता, याचा अभिमान असून गेल्या कित्येक वर्षापासूनची हिंदूंची इच्छा पूर्ण झाली असल्याने संपूर्ण देशभरात रामनवमीचा उत्साह अतिशय जोरदार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले

पुढे ते म्हणाले की, मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम आमच्या जीवनाचा आदर्श असून त्यांच्या आदर्श असून त्यांचे आदर्श जीवन चरित्र रामायणाच्या माध्यमातून त्या सर्वांच्या हृदया हृदयापर्यंत पोहोचलेली असल्याने खऱ्या अर्थाने भारततील जनता संस्कारक्षम असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

दरम्यान माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते प्रभू रामचंद्राच्या प्रतिमेचे पूजन करून माल्या अर्पण करत प्रभू रामचंद्राची भव्य दिव्य मिरवणूक सुरू करण्यात आली या मिरवणुकीतील ढोल पथक गोंधळी, पारंपारिक वेशभूषा घातलेले महिला पुरुष भगव्या पताका भगवे ध्वज सर्वांचे लक्ष आकर्षित करून घेत होते अनेक ठिकाणी फराळाची व्यवस्था करण्यात आली होती तर अनेकांनी आपापल्या घरावरून या मिरवणुकीवर पुष्पवृष्टी करत राम जन्मोत्सव साजरा केला

रामभक्तांचा उत्साह श्रीराम नामाच्या जय घोषाने ओसंडून वाहत होता. महिला, पुरुष, आबालवृद्ध जय श्रीरामाच्या टोप्या परिधान करून शोभायात्रेत सहभागी झाले होते. भजन, संकीर्तन, फुगडी, पावली, संबळ पथक, ढोल पथकाचा निनाद, लेझिम पथक,फटाक्यांची आतीषबाजी,आश्वारूढ प्रभू रामचंद्रांची भव्य मूर्ती, श्रीराम,मिरवणुकीत शहरातील नागरिक -माता भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.शहर आणि तालुक्यातील हिंदू तरुणांनी देखील या मिरवणुकीत मोठा सहभाग दाखवला. मिरवणुकीत महिलांनी पारंपारिक वेशभूषा परिधान करून मोठ्या संख्यने सहभाग नोंदवला.शहरात ठिक -ठिकाणी राम भक्तांसाठी अनेक सेवाभावी ग्रुप, संस्था, गणेश मंडळानी नाश्ता -पाण्याची तसेच थंडपेयाची व्यवस्था केली होती.मिरवणुकीच्या मार्गावर ठिक -ठिकाणी आकर्षक रांगोळी रेखाटण्यात आली होती. मिरवणुकीच्या मार्गावरील रस्ते गर्दीने फुलून गेले होते.अखंड पणे सुरु असलेला राम नामाचा गजर आणि रामाच्या जयजयकारामुळे वातावरण भक्तीमय होऊन परतूर शहर राममय आणि भगवामय झाले होते.या मिरवणुकीत सकल हिंदू समाजाने मोठ्या संख्यने सहभाग घेतला. सर्व हिंदू बांधव भगिनी यांनी कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल सावता काळे यांनी आभार मानले शोभयात्रेचा समारोप गाव भागातील श्री.खंडोबा मंदिरात हनुमान चालीसा पठणाने करण्यात आला.

माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्यासह भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर, सुभाष अंभोरे अर्जुन जगताप, सावता काळे, सचिन काटे, आनंद कोटेचा, राजेश मंत्री, जयवंत हातवणकर, अनिल देशपांडे, सुनील कासट, सौरभ बगडिया, सुरेश दसमले, योगेश खंडेलवाल, अभिजित जोशी, गोविंद मुंदडा, ॲड. सुरेश काळे, हनुमंत दवंडे, कुलदीप बिंनगे, सखाराम कुलकर्णी, सौरभ नरवैये, कुणाल बन्सिले, भगवानराव मोरे, दया काटे, शत्रुघन कणसे, संपत टकले, रमेश भापकर, सुधाकर सातवणकर, प्रवीण सातोणकर, संदीप बाहेकर, प्रकाश चव्हाण, कृष्णा आरगडे, ओम मोर, अमोल अग्रवाल, अमर बगडिया, अजित पोरवाल, रंगनाथ येवले, सनी तनपुरे, संतोष हिवाळे, विजय यादव, विकास बोडखे, गोपी ठाकूर, विठ्ठल कुलकर्णी, राजेंद्र मुंदडा, अमोल शहाणे, कैलास चव्हाण, प्रमोद राठोड, नरेश कांबळे, सोनवा अग्रवाल, ज्ञानेश्वर जईद, दिगंबर मुजमुले, सनी तनपुरे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला पुरुष भक्तांची उपस्थिती होती.

## वाचकांचे मनोगत

# झाडांच्या वाढलेल्या फांद्या छाटणार कोण ?

कोकणातील जनता अडचणींतून जाते,अडचणी सहन करते म्हणूनच शासन कायम दुर्लक्षित ठेवते.अडचणी सोडवण्यासाठी ना मोर्चे निघत ना आंदोलने होत.रस्त्यांची समस्या पाचवीलाच पुजलेली.पाणी टंचाई, दवाखान्यात डॉक्टर आहेत तर औषधे नाहीत दोन्ही असतील तर वैद्यकीय यंत्रसामुग्री नाही.शाळा आहेत तर विद्यार्थी नाहीत. विद्यार्थी आहेत तेथे शिक्षक नाहीत असा हा पाठशिवणीचा खेळ कोकणातील जिल्हे तालुक्यात आहे.कोकणात विपुल वन संपत्ती आहे तसेच पावसाळ्यात वाढणारी रोपटी,झाडे आहेत. कोकणात सर्वाधिक मिलीमीटर पाऊस पडतो.पावसाचे पाणी समुद्रात जाऊन मिळते.नागरिकांना जानेवारी पासून पाणी टंचाई समस्येतून जावे लागते.तरीही कुठेच आंदोलन, धरणे,ठिय्या आंदोलन, मोर्चे निघत नाहीत. गावा गावात जिल्हा परिषदचे अरुंद रस्ते आहेत.सार्वजनिक बांधकाम खात्याचे रस्ते आहेत. रस्त्यांच्या दोन्ही बाजूला वाढलेल्या झाडांच्या फांद्या छापण्याची जबाबदारी कोणाची ? ग्रामपंचायत, पंचायत समिती ,जिल्हा परिषद की सार्वजनिक बांधकाम खाते यांची.महानगर क्षेत्रातील फांद्या छापण्याची जबाबदारी उद्यान विभागाची असते.ग्रामीण भागातील रस्त्या लगत वाढलेल्या झाडांच्या फांद्या अपघाताला कारणीभूत ठरत आहेत. अरुंद रस्त्यावर दोन वाहने आमने सामने येतात तेव्हा वाढलेल्या फांद्या वाहनांना लागतात तेव्हा गाड्यांचे अतोनात नुकसान होते.स्थानीक लोकप्रतिनिधीं आमदार, खासदार यांनी यांनी परिस्थिती लक्षात घेऊन शासनाच्या संबंधित प्राधिकरणाकडून फांद्या छाटून द्याव्यात अशी स्थानिक नागरिकांची मागणी आहे.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई**
**९८६९४७६२०९**, mahadeogolvaskargmail.com

# बिजांकुर हायटेक प्रोड्युसर कंपनीच्या सेंद्रीय अन्न धान्यास मोठी मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय आणि 'आत्मा' च्या वतीने नुकतेच पाच दिवसीय जिल्हा कृषी प्रदर्शन आजाद मैदान येथे पार पडले. या शेतकरी महोत्सवामध्ये जालना तालुक्यातील पाचनवडगाव येथील बिजांकुर हायटेक प्रोड्युसर कंपनी लिमिटेडच्या वतीने एका दालनामध्ये विषमुक्त धान्य व भाजीपाला ठेवण्यात आला होता. याला जालन्यातील नागरिकांसह शेतकर्यांनी मोठा प्रतिसाद दिला.या आगळ्या वेगळ्या सेंद्रीय अन्न धान्य उत्पादन करणार्या बिजांकुर कंपनीने सेंद्रीय गहु, ज्वारी, जवस हे पदार्थ विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. या दालनास जिल्हा कृषी अधीक्षक गहिनीनाथ कापसे, आत्माचे संचालक अमोल आगधने, जे.पी.शिंदे, दत्तात्रय सूर्यवंशी यांनी भेट देऊन कंपनीच्या उत्पादनांची पाहणी करून कौतूक केले. या प्रदर्शनात बिजांकुर कंपनीचे संचालक रामकिसन वायाळ, नामदेव नागवे, संतोष काकडे, विश्वंभर कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

## पान १ वरुन

### गॅस सिलिंडर ...

जाऊ शकतो. तसेच पेट्रोल आणि डिझेल दराबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावर जो ट्रेंड सुरू आहे तो कायम राहिला तर त्याचाही आढावा घेतला जाऊ शकतो असं केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी स्पष्ट केलं.

केंद्रीय मंत्र्यांच्या या वक्तव्यानंतर यापुढे गॅस दराच्या किमती सातत्याने वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे

### रोजगार मेळाव्यातून ...

सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

या रोजगार मेळाव्यात ०८ नामांकित कंपनीचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. त्यांनी मुलाखतीतून ८४ उमेदवारांची विविध पदाकरिता प्राथमिक निवड केली. यात प्रीम सोल्यूशन प्रा. लि. (सलाम किसान) जालना ०८, प्रीम सोल्यूशन प्रा. लि. जालना ०३, कलश सीड्स प्रा. लि. जालना १५, एस.बी.आई इन्शुरेंस कंपनी लि. जालना ११, राजुरी स्टील्स टी एम टी बार्स प्रा. लि. जालना १६, प्रथम एजुकेशन फाउंडेशन छ. संभाजीनगर १०, रिध्दी सिध्दी सर्व्हिसेस, जालना ०७, भाग्य लक्ष्मी रोलींग मिल्स प्रा. लि. जालना १४ याप्रमाणे उमेदवारांची निवड केली आहे

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. माधव ढेरे यांनी केले तर आभार सुरेश बहुरे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाचे कौशल्य विकास अधिकारी भुजंग रिठे तसेच डॉ. अमोल परिहार, अमोल बोरकर, प्रदिप डोळे, सुभाष पंडित, रविंद्र पाडमुख, विशाल जगरवाल, अमर तुपे, निर्मल बिडकर आणि महाविद्यालयाचे प्राचार्यडॉ. संजय पाटील उप प्राचार्य, डॉ. संतोष करवंदे, डॉ. रामनाथ सांगळे, डॉ. कार्तिक गवांडे, डॉ. अर्जुन जाधव, डॉ. रामदास वैद्य यांनी तसेच महाविद्यालयाचे सर्व कर्मचारी यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. असेही कळविले आहे.

### २०२९ मध्ये ...

पैसे देऊन दानवेंनी मला पराभूत केलं त्यामुळे २०२४ च्या निवडणुकीत दानवेंना देवानं जालन्यात पराभूत केलं असा टोला खैरे यांनी रावसाहेब दानवे यांना हाणला.मैदान पुढे आहे आम्ही पुन्हा परत येणार असा ईशारा देखील खैरे यांनी भाजपला दिला.

### आजपासून जालन्यात ...

ज्येष्ठ सामाजिक नेते सुभाष गाडगे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

दिनांक १२ एप्रिल रोजी जळगाव येथील प्रसिद्ध विचारवंत डॉ. देवेंद्र इंगळे हे 'आंबेडकरी चळवळ: पुनरूत्थानाची दिशा' या विषयावर व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प गुंफणार आहेत. यावेळी ज्येष्ठ सामाजिक नेते सुधाकरराव रत्नपारखे हे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. यावेळी डॉ भगवानसिंह डोभाळ,माजी नगराध्यक्ष भास्कर अंबेकर, सामाजिक नेते विलास डोळसे , प्रमोद रत्नपारखे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

दिनांक १३ एप्रिल रोजी नाशिक येथील प्रसिद्ध गायक चेतन लोखंडे यांच्या भीमगीत गायनाचा कार्यक्रम होणार आहे. सामाजिक कार्यकर्ते संदीप खरात हे यावेळी अध्यक्षस्थानी राहणार आहेत.

जालना शहरातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते तसेच नागरिकांनी या व्याख्यानमालेतील मान्यवर विचारवंतांचे मौलिक विचार ऐकण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे अध्यक्ष ड. शिवाजी आदमाने,सचिव प्रा. डॉ.विजय कुमठेकर, कार्याध्यक्ष बबनराव रत्नपारखे, कोषाध्यक्ष डॉ. शांताराम रायपुरे,उपाध्यक्ष ड. महेंद्र साळवे, नवनाथ लोखंडे, महेंद्र रत्नपारखे, सहसचिव ड. बी. एम. कुलकर्णी, सुहास साळवे, राजू मोरे आदींनी केले आहे.

### संतांच्या सहवास व नामस्मरणाने जीवन सुधारून जगण्याचा मार्ग सापडतो - हभप कार्तिक महाराज

**जाफराबाद -** संतांच्या सहवास व नामस्मरणाने जीवनमान सुधारून जगण्याचा मार्ग सापडतो जीवनाच्या अवघड रस्त्यांनी वाटचाल करत असताना हा रस्ता सोपा करण्यासाठी संतांची संगत व नामस्मरण आवश्यक असल्याचे निरूपण हभप युवा कीर्तनकार कार्तिक महाराज घाडगे यांनी केले. जाफराबाद तालुक्यातील देवळेगव्हाण येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या पहिल्या दिवशीचे पुष्प गुफतांना ते बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की,जीवनात आलेल्या प्रत्येकाला मृत्यूला सामोरे जावे लागणार आहे.प्रत्येकाची वेळ ठरलेली असून जीवन हा पाण्याचा बुडबुडा आहे,कधी कोलमडून पडेल याचा नेम नाही त्यामुळे आपले कर्म व नियत साफ ठेवून इतरांनाही आनंद देण्याचा प्रयत्न आपल्याकडून झाला पाहिजे. ते म्हणाले की या जगात साधू संतांचे विशेष महत्त्व असून धरती,सूर्य ,चंद्र, नदी,वृक्ष ,समुद्र हे परोपकारासाठी असून यांच प्रमाणे मानव देह प्राप्त मानवाने सुद्धा परोपकारी वृत्ती ठेवल्यास जीवन साध्य झाल्याशिवाय राहणार नसल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. ज्ञानाशिवाय माणूस अपूर्ण गंगा पार करायची असेल तर पोहणे आवश्यक आहे,तसेच मनुष्य जिवन जागे ठेवायचे असेल तर ज्ञानाची कास धरणे गरजेचे आहे.आयुष्याच्या परीक्षेत तुम्हाला पास व्हायचे असेल तर माणसे ओळखायची शिकुन तरुणांनी व्यसनापासून दूर राहण्याचा कळकळीचा सल्ला त्यांनी यावेळी दिला.या कार्यक्रमाला गावकऱ्यांची ,महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या भव्य दिव्य होत असणाऱ्या कीर्तन सोहळ्यात युवा कीर्तनकार श्री कार्तिक महाराज घाडगे यांनी गावातील वैकुंठवासी नाना महाराज पंडित यांनी सुरू केलेल्या देळेगव्हाण ते पैठण पायी दिंडी सोहळ्याचे गुणगान गात त्यांच्यामुळे आज गावातील शेकडो महिला व पुरुष दरवर्षी प्रमाणे पायी दिंडी सोहळा उत्साहात करत आहेत.

# एलपीजी दरवाढ ही जनतेवरील अन्याय; तत्काळ निर्णय मागे घ्या - खा. डॉ. काळे

**जालना । प्रतिनिधी -** केंद्र सरकारने एलपीजी गॅस सिलिंडरच्या किंमतीत रू ५० ची वाढ जाहीर केली असून, हा निर्णय गरिबांच्या स्वयंपाकघरावर थेट आघात करणारा आहे. ही दरवाढ प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांनाही लागू होणार असल्यामुळे, गरीब व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांवरील आर्थिक ताण अधिकच वाढणार असल्याने ही दरवाढ तत्काळ मागे घ्यावी अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली आहे.



यासंदर्भाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, ८ एप्रिल २०२५ पासून पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात प्रति लिटर २ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. जरी सरकारने आणि सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांनी सांगितले असले की या निर्णयाचा ग्राहकांवर कोणताही थेट परिणाम होणार नाही, तरीही यामागे लपलेली वास्तव परिस्थिती वेगळी आहे.

सरकारने यावेळी आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या दरात झालेली घट ही एक संधी म्हणून वापरली. ब्रेंट क्रूडचा दर सध्या ६३.२३ डॉलर प्रति बॅरलपर्यंत घसरला आहे, जे सुमारे ३ टक्क्यांची घसरण आहे. या घसरणीमुळे देशांतर्गत इंधनाच्या किमती कमी व्हाव्यात, अशी सामान्य नागरिकांची अपेक्षा होती. परंतु, सरकारने त्या कपातीचा लाभ थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याऐवजी उत्पादन शुल्क वाढवून तो लाभ आपल्या महसूल वाढीसाठी वापरला.

ही वाढ जरी सध्या तेल कंपन्यांनी absorb केल्याचं म्हटलं जात असलं, तरी याचा दीर्घकालीन परिणाम ग्राहकांवर होऊ शकतो. भविष्यात जर आंतरराष्ट्रीय किमती पुन्हा वाढल्या, तर तेल कंपन्यांवरचा आर्थिक ताण वाढेल आणि तो शेवटी किरकोळ दरात वाढ होऊन सामान्य नागरिकाच्या खिशावर आदळेल.

याशिवाय, उत्पादन शुल्क हे एक अप्रत्यक्ष कर आहे. म्हणजेच कोणतीही थेट किंमत वाढ न करता सरकारने कररूपाने ग्राहकाकडून अधिक पैसे उकळण्याची ही यंत्रणा आहे. त्यामुळे सध्या दर वाढले नाहीत, हे खरं असलं, तरी ग्राहकांच्या अपेक्षित बचतीवर 'कराचा भार' टाकण्यात आला आहे.

सरकारने याआधी पेट्रोल-डिझेलवरील उत्पादन शुल्क कपात करून महागाई कमी करण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळेच आता कच्च्या तेलाच्या दरात घट झालेली असताना, ग्राहकाला त्याचा सकारात्मक परिणाम दिसायला हवा होता. तो लाभ वंचित ठेवून, सरकारने महसूल वाढीचा मार्ग स्वीकारल्याने या निर्णयावर प्रश्नचिन्ह निर्माण होते.

पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात वाढ ही केवळ महसूल वाढवण्याची युक्ती असून, ग्राहकांच्या अपेक्षांवर पाणी फेरणारा निर्णय आहे. तो सध्या थेट परिणाम दाखवत नसलाच, तरी भविष्यात त्याचे अप्रत्यक्ष परिणाम निश्चितच भोगावे लागतील असेही खा. डॉ काळे यांनी म्हटले आहे.

## मनपाच्या हलगर्जीपणामुळे एकाच घरातील चौघांना डेंग्यूची लागन; महिलेने मांडली व्यथा

**जालना । प्रतिनिधी** - नगर परिषदेची आता शहर महानगरपालिका झाली आहे परंतु सुविधेच्या बाबतीत मात्र जालना महानगरपालिका ही एखाद्या गाव-खेड्या पेक्षाही मागे राहिली असल्याचा आरोप मिल्लत नगर येथील नागरिकांनी केलाय. नाल्यांचे घाण पाणी रस्त्यावर येणे, त्यामुळे डास, मच्छरांची उत्पत्ती होणे, मलेरिया, डेंगू, हिवताप सारखे आजार बळावणे असे मिल्लत नगर मध्ये दिसून येत असल्याचे नागरीकांचे म्हणणे आहे. एकाच घरातील चार चिमुकल्यांना डेंग्यूची लागण होऊन चार लाख रुपयांच्या भुर्दंड एका परिवाराला भोगाव लागला असल्याची व्यथा येथील एका महिलेनी मांडली. स्वच्छता कर्मचारी असो किंवा अधिकारी असो इकडे फिरकतच नसल्याचा आरोपही स्थानिक नागरिकांनी केला. कित्येक दिवसांपासून घाण पाणी अक्षरशः रस्त्यावर वाहत आहे परंतु संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांना किंवा अधिकाऱ्यांना हे दिसत कसं नाही असा सवालही येथील नागरिकांनी केला. अंडरग्राउंड नाल्या पूर्णपणे ब्लॉक झाल्यामुळे चेंबर मधून नाल्याच्या घाण पाणी रस्त्यावर वाहत आहे. तुडुंब भरलेले अंडरग्राउंड नाल्या, ड्रेनेज आणि ढापे तसेच रस्त्यावर वाहणारे घाण पाणी चार दिवसांमध्ये पालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्वच्छ केले नाही तर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने यासाठी आंदोलन करतील असा इशाराही नागरिकांनी दिला. घाण, कचरा, नाल्यांचे पाणी यासारख्या गोष्टींसाठी नागरिकांना आंदोलने, आणि उपोषणे करावी लागत असतील तर एवढा मोठा कोट्यावधी रुपयाचा हा कारभार कशासाठी आणि कोणासाठी चालवल्या जात आहे असा संतप्त सवाल मिल्लत नगर येथील नागरिकांनी केला. यावेळी असदअल्लाह रजवी, रहिवासी, रेहाना परवीन बाजी, मालिहा फातिमा बाजी, शबाना बाजी, सामिना , बाजी, वसीम शेख, समाज कार्यकर्ते साद बिन मुबारक, समी कौसर, शेख सलीम जाहिदाबाजी, शेख कलीम, सय्यद कलीम, फिरोज बागवान, नदीम अहमद, यांच्यासह परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.







# बनावट भन्ते म्हणून फिरणाऱ्या कश्यपलीवर कारवाई करा

### भिख्खू संघ आणि बौध्द समाजाची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यामध्ये बनावट भन्ते म्हणून फिरणार्या व बौध्द धम्म मान्य असल्याचे सांगून बौध्द भिख्खूचे चिवर परिधान करुन अवमान करणार्या कश्यपली वर कारवाई करावी अशी मागणी सोमवार दि. ७ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ४.३० वाजता भिख्खू संघ आणि बौध्द समाजाच्या वतीने करण्यात आली. त्यासाठी अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी यांची भेट घेऊन कायदेशी करावाई करण्याचे निवेदनही देण्यात आले.

जालना जिल्ह्यातील विविध ठिकाणी कश्यपली हे स्वतःला बौध्द भिख्खू म्हणून घेत फिरत असून तरुणांना हिंसेच्या मार्गावर नेत आहेत. त्यांनी तरुणांची डोके भडकवण्याचे काम सुरु केले आहे. हातात शस्त्र घेऊन ते हिंसेचे समर्थन करीत असून बौध्द धम्म हा हिंसेचे समर्थन करीत नाही. शिवाय दोन समाजामध्ये तेढ निर्माण करुन कायदा आणि सुव्यस्थेचा प्रश्न कश्यपली निर्माण करीत असल्याचेही निवेदनात म्हटलंय. यावेळी भंते शिवली शाक्यपुत्र, भन्ते रेवत, भन्ते धम्मदीप, भन्ते चंद्रमणी, अ‍ॅड. रिमा काळे-खरात, बबन मगरे, राजेश राऊत, संदीप खरात, महेंद्र रत्नपारखे, संजय हेरकर, राजेश सदावर्ते, विशाल सोनवणे, अलोक सरवडीकर, गौतम वाघमारे, प्रदीप रत्नपारखे, मनोज भिसे, सागर नक्का, दीपक रत्नपारखे, विश्वजीत खरात, समाधान रत्नपारखे, राहुल रत्नपारखे, बबलू साळवे यांच्यासह सकल बौध्द समाजातील नागरिक उपस्थित होते.

# जिजाऊ रथयात्राचे मंठा शहरात पुष्पवृष्टी व ढोल पथकाने स्वागत

**मंठा । प्रतिनिधी -** मराठा सेवा संघ संचलित जिजाऊ रथयात्रा-२०२५ अंतर्गत मराठा जोडो आणि शिवसंकल्प अभियान शुक्रवारी (दि. ०४) मंठामध्ये दाखल दाखल झाली आहे. या रथयात्रेचे स्वागत मोठ्या उत्साहात झाले. महिला-पुरुष, तरुण-तरुणी, शाळकरी मुले-मुली, ढोल पथक सहभागी झाले होते.

राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेरणेतून सामाजिक सलोखा, एकता, बंधुभाव, प्रबोधन आणि परिवर्तनासाठी हा उपक्रम राबवला जात आहे. संत आणि महापुरुषांच्या विचारांचा जागर करण्यासाठी ही रथयात्रा संपूर्ण महाराष्ट्रात फिरत आहे. १८ मार्च रोजी स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांच्या जयंतीनिमित्त वेरूळ येथील भोसले गढी येथून या यात्रेला सुरुवात झाली. १ मे रोजी पुण्यातील लाल महाल येथे महाराष्ट्र दिनी आणि कामगार दिनी या यात्रेची सांगता होणार आहे. शुक्रवारी ही रथयात्रा परतूर मार्गे मंठाकडे आली होती. मार्गातील गावांमध्ये स्वागताची ठिकठिकाणी तयारी होती. मंठा मध्ये छत्रपती संभाजी महाराज चौक विडोळी फाटा येथे रथयात्रेचे स्वागत करण्यात आले.

**रथयात्रेतील महत्त्वाचे विषय आणि उद्दिष्टे**

संविधान, कायदा आणि हक्क याबद्दल जनजागृती नागरिक म्हणून आपली जबाबदारी आणि कर्तव्ये समजावून सांगणे, सामाजिक एकता आणि एकात्मताः समाजात सलोखा आणि ऐक्य राखण्याचे महत्त्व, जातीय तेढ आणि सामाजिक दुभंग यावर प्रबोधन- सर्व धर्म, जात आणि पंथ यांना जोडणारे विचार मांडून एकतेचा संदेश. धार्मिक आणि राजकीय उन्माद टाळण्यासाठी संवाद व शहाणपणाचे विचार समाजात द्वेष आणि मतभेद नको, तर परस्पर सहकार्याची भावना जोपासणे. शेती आणि अर्थव्यवस्थाः शेतकरी समस्या, त्यावरील उपाययोजना आणि बदलत्या अर्थव्यवस्थेतील नवीन संधी. रोजगार आणि शिक्षणः जागतिकीकरणाच्या युगातील नव्या संधी, युवकांसाठी रोजगारविषयक मार्गदर्शन आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व. युवकांना विधायक मार्गाकडे वळवण्यासाठी मार्गदर्शन व्यसनाधीनता, बेरोजगारी, दिशाभूल करणाऱ्या प्रवृत्तींना थांबवण्यासाठी मार्गदर्शन आणि प्रेरणा.महिला सक्षमीकरणः महिलांसाठी असलेल्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक संधींबाबत चर्चा. महिला सक्षमीकरण आणि सुरक्षितता बावर विशेष भर शासकीय योजना आणि लाभ शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती व त्याचा समाजातील प्रत्येक घटकाने कसा लाभ घ्यावा,याबाबत मार्गदर्शन. गुन्हेगारी आणि भ्रष्टाचार निर्मूलनाविषयी जनजागृती समाजातील प्रत्येक व्यक्तीने जवाबदारीने कायद्याचे पालन करणे, सुशासनासाठी सजग नागरिक होणे.सामाजिक विण पुन्हा मजबूत करण्यासाठी कुटुंबसंस्था, संस्कार आणि परंपरांचा सन्मान मराठ्यांच्या उज्वल परंपरेचे स्मरण करून सामाजिक बांधिलकी दृढ करणे.



# उद्योग उभारणीसाठी मुलभूत तत्वांचा वापर करावा - के. डी. दांडगे

**जालना । प्रतिनिधी -** मिटकॉन प्रशिक्षण केंद्र व उद्योजकता विकास विभाग यांच्या वतीने जालना येथे आज दि.०७ एप्रिल २०२५ रोजी एक दिवशीय व्यावसायिक कार्यशाळा घेण्यात आली..यावेळी के डी दांडगे, जिल्हा प्रकल्प अधिकारी, मिटकॉन, जालना, यांचें मार्गदर्शन लाभले सोबत शेख शरीफ व प्रशिक्षणार्थी यांची उपस्थिती होती.या प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना श्री दांडगे म्हणाले की युवकांनी उद्योग उभारणीसाठी मुलभूत तत्वांचा वापर केला पाहिजे,उद्योगाची मुलतत्वे शोधल्यास अपयश मिळत नाही तर यशाचे शिखर गाठता येते. या प्रशिक्षणात उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा,व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निम शासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योगांच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, राष्ट्रीय पशुधन विकास योजना,प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बॅंकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने या विषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे.अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी मिटकॉन द्वारा पत्रकार भवन , एस पी ऑफीस समोर जालना मो.९४२३७३०९३२ येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.



# अठरा तास अभ्यासिकेचे आयोजन



**मंठा । प्रतिनिधी -** महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती मंडळाच्या वतीने प्रत्येक वर्षी १८ तास अभ्यासिकेचे आयोजन करण्यात येते की परंपरा १५ वर्षांपासून सुरू असून महान चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या जयंती निमित्ताने दिनांक पाच रोजी सम्राट अशोक वाचनालय मंठा येथे विजय शिरसाठ यांच्या अध्यक्षतेमध्ये, बीके खरात यांच्या हस्ते उद्घाटन करून आसाराम साबळे कैलास लांडगे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये अभ्यासिकेचे आयोजन करण्यात आले यावेळी विद्यार्थ्यांना बोलताना विजय शिरसाठ मनाली की, विद्यार्थ्यांनी १८ तास अभ्यासक्रमाचा पाढा आपल्या आयुष्यामध्ये गिरवावा आणि आपल्या आयुष्याचे सोने करून घ्यावे अभ्यास करताना विद्यार्थ्यांनी आपल्या डोळ्यासमोर आदर्श बाबासाहेबांचा असावा यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष स्वप्निल गोंडगे विलास बनसोडे धम्मानंद वाघमारे भारत खंदारे महेंद्र टेकाळे जितेश वाघमारे आकाश पंडित विजय चव्हाण सम्राट अवचार संदेश प्रधान गंगाराम गवळी विजय वाघमारे महादेव पाखरे यांची उपस्थिती होती तर उत्कृष्ट संचालन शुभम अंभोरे यांनी केले

# मंठा शहर राममय; रामनवमी निमीत्त भव्य शोभयात्रा !



**मंठा । प्रतिनिधी -** येथील सकल हिंदू समाजाच्या वतीने श्री राम नवमी निमित्त रविवारी सायंकाळी जय श्रीराम...च्या जयघोषात श्रीरामनवमी भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेच्या स्वागतासाठी संपूर्ण मंठा शहर सजले होते. श्री जागरूक हनुमान मंदिरापासून मंठा शहरातील सकल हिंदू समाजाच्या वतीने श्रीराम मूर्तीला पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. नंतर शहराच्या जागरूक हनुमान मंदिर,लहुजी चौक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक,छत्रपती संभाजी महाराज चौक,जय श्रीराम चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक या प्रमुख मार्गावरून शोभायात्रेस सुरूवात झाली.

मिरवणुकीत प्रभू रामचंद्र ७ फूट उंचीची भव्य मूर्तीसह शोभायात्रेला संगीत वाद्य वाजवून अवघे शहर राममय झाले होते. जयश्रीरामच्या घोषणांनी अवघे शहर दुमदुमले होते.

यावेळी समस्त हिंदू बांधवासह आजी, माजी नगरसेवक व कार्यकर्त्यांनी शोभायात्रेत सहभाग दर्शविला. रात्री उशिरापर्यंत ही शोभायात्रा सुरू होती. शोभायात्रा पाहण्यासाठी मंठा शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. भव्य भगव्या कमानी, डिजीटल फलक, भगव्या पताका, आणि भगव्या झेंड्यासह भगवा पेहरावा परिधान करून सहभागी झालेला युवा कार्यकर्ता शोभायात्रेची शोभा वाढविताना दिसत होता.

या शोभायात्रेचा श्री राम मंदिर येथे आरती करून समारोप करण्यात आला. राम भक्तांना हिंदू बांधवांकडुन महाप्रसादचे आयोजन करण्यात आले होते.

# सर्व मिळून देश बलवान करू या - देवेंद्र भुजबळ

**मुंबई । प्रतिनिधी -** भारत देश हा विविधतेने नटलेला आहे.अनेक धर्म, प्रांत, भाषा, संस्कृती,इतिहास, समाज जीवन या बाबी कितीही वेगवेगळ्या असल्या तरी त्या कलहाचा विषय न ठरता , विविधतेतील एकता जपत आपण सर्व भारतीय म्हणून देशाला बलवान करू या आणि प्रगती साधू या,असे आवाहन माध्यमकर्मी देवेंद्र भुजबळ यांनी केले.ते रोटरी इंटरनॅशनल संस्थेच्या रोटरी क्लब नवी मुंबई सी साईडच्या वतीने देण्यात आलेल्या व्यावसायिक नैपुण्य पुरस्कार प्राप्त केल्यानंतर सत्काराला उत्तर देताना बोलत होते.

श्री भुजबळ पुढे म्हणाले की, भारतातील भाषा वैविध्य पाहून भारत सरकारने त्रिसूत्री भाषा धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे तसेच ज्या भागात आपण राहतो,त्या भागातील स्थानिक भाषा आत्मसात केल्यास त्या भागाचा इतिहास,भूगोल, साहित्य, संस्कृती ,समाज मन आपण अधिक चांगल्या प्रकारे समजू शकतो. त्यामुळे आपण आपल्या नोकरी,व्यवसायात सुद्धा अधिक प्रगती करु शकतो, ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्रात राहणाऱ्या सर्वांनी मराठी भाषा आत्मसात केली पाहिजे. सोबतच राष्ट्रीय स्तरावरील भाषा म्हणून हिंदी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील भाषा म्हणून इंग्रजी देखील आत्मसात केल्यास भाषेमुळे होणारे वाद विवाद न होता शांततेच्या मार्गाने सर्वच प्रगती साधू शकतील.

आज जागतिक पातळीवर अमेरिका आणि चीन या बलाढ्य देशांच्या आर्थिक परिस्थितीशी मुकाबला करीत भारताला महासत्ता व्हायचे आहे. पण भारत महासत्ता होण्यासाठी अंतर्गत कलहामुळे तो दुबळा होणार नाही याची प्रत्येक नागरिकाने काळजी घेतली पाहिजे,असे सांगून त्यांनी १२० वर्षांपूर्वी सर्व जगाच्या कल्याणासाठी स्थापन झालेल्या ,जगातील सर्वात मोठ्या अशा रोटरी इंटरनॅशनल या स्वयंसेवी संस्थेचा पुरस्कार मिळाल्याने काम करायला अधिक हुरूप येईल असे सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून बोलताना माजी मुंबई डिस्ट्रिक्ट गवर्नर बन्सी धुरंधर यांनी व्यक्तींना प्रगती साधायची असेल तर त्यांनी आपली दृष्टी विशाल करण्याची गरज आहे असे सांगून रोटरी ची ध्येय धोरणे विषद केली. तसेच दर वर्षी कार्यकारिणी बदलण्याचे रोटरीचे धोरण असून सुद्धा रोटरी क्लब नवी मुंबई सी साईड गेली २२ वर्षे सातत्याने व्यावसायिक नैपुण्य पुरस्कार देत असल्याबद्दल अभिनंदन केले. प्रारंभी रोटरी क्लब नवी मुंबई सीसाईड चे अध्यक्ष सुनील शाह यांनी सर्वांचे स्वागत करून



क्लबच्या वाटचालीची माहिती दिली. क्लबच्या व्यावसायिक सेवा विभागाचे संचालक तथा माजी अध्यक्ष कपिल अगरवाल यांनी हे पुरस्कार प्रदान करण्याबाबतची भूमिका स्पष्ट करताना सांगितले की,या पुरस्कारांसाठी विविध क्षेत्रातील व्यक्ती आणि संस्था नावे सुचवितात. त्यांच्या कडून आलेल्या नावे आलेल्या व्यक्तींच्या कार्याचे मूल्यमापन ५ सदस्यांची निवड समिती करते आणि त्या नंतर पुरस्कारांसाठी नावे अंतिम होतात. सर्व पुरस्कार प्राप्त करणाऱ्यांची माहिती असलेल्या विशेषांकाचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.या सुंदर,माहितीपूर्ण विशेषांकाचे संपादन युवा पत्रकार कुमारी संजना दाश हिने केले आहे.

या वेळी वैद्यकीय सेवेबद्दल डॉ फातिमा शेख, सेवा कार्याबद्दल सौ क्रांती आणि श्री दिगंबर चापके दाम्पत्य, दृष्टी बाधित मुलांसाठी कार्य करणाऱ्या नेहा खरे,नृत्यांगना डॉ शर्मिष्ठा चटोपाध्याय, फुटबॉल खेळाडू कुमारी अनन्या तेरडाळें, डिजिटल तज्ज्ञ राजीव राणा,चित्रकार सुरेश नायर,युवा टेनिस खेळाडू ऋषिकेश माने,भटक्या जनावरांच्या सुरक्षेसाठी कार्य करणारे डेटा इंजिनिअर अक्षय रिदलान, बाल टेनिस खेळाडू आरव छल्लानी, नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्यातील वंचित घटकांसाठीच्या आरोग्य सेवा कार्याबद्दल सुनीलकुमार प्रभाकरन यांनाही व्यावसायिक नैपुण्य पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी मनस्वी बलवटकर हिने प्रभावीपणे केले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर,रोटरीचे सदस्य, पुरस्कार विजेत्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.